21 JUN 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज योग शिबिर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



'मटा'सह विद्यापीठ, सिद्धगिरी मठातर्फे आयोजन

सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकजण आपल्या शरीराची काळजी घेतो. अर्थात त्याचे स्वरूप कमी-अधिक असू शकेल किंवा शरीराकडे लक्ष देण्यास फारसा वेळ मिळत नसेल. त्यासाठी कमी वेळात 'योगा' करून आरोग्याची काळजी घेणे शक्य आहे. याची महती सांगणारा आंतरराष्ट्रीय योग दिन आज (बुधवारी) साजरा होत आहे.

यानिमित्त महाराष्ट्र टाइम्स, शिवाजी विद्यापीठ आणि सिद्धगिरी मठ यांच्या संयुक्त विद्यमाने योग शिबिर होत आहे.

आज (बुधवारी) सकाळी ६.३० वाजता शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात योग शिबिर होईल. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये 'योग' या विषयाबाबतची शास्त्रीय माहिती, योगाचे महत्त्व, फायदे याविषयी तज्ज्ञांकडून प्रात्यक्षिके केली जाणार आहेत. योग शिबिरासाठी हेल्थ पार्टनर म्हणून अॅस्टर आधार हॉस्पिटलचे सहकार्य लाभणार आहे.

वस्तुत: शरीर, मन आणि आत्मा यांना एकत्र आणणे म्हणजे योगाभ्यास असे मानले जाते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये वाढलेल्या धावपळीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे. परिणामी तणाव, व्याधी हे माणसाच्या जीवनातील तणावग्रस्त राहू लागले आहेत. माणसाची बिघडत चाललेली हालचाल, अस्थिरता, एकटेच स्वत:शी मोठ्याने बोलणे, आदी लक्षणे साहजिकच वाढू लागली. नोकरीसाठी ये-जा, तेथील काम, घरी आल्यानंतरही काम, हे सगळं मॅनेज करता करता दिवस कमी पडू लागला आहे. आजची ही बिझी लाइफस्टाइल तणावग्रस्त बनली आहे. त्यामुळेच योगाभ्यासाला अधिक महत्त्व आले आहे.

त्यामुळेच २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जगभर साजरा होत आहे. याच दिवशी सकाळी ६.३० वाजता शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात हे शिबिर होणार आहे. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



- शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात शिबिर होणार
- आज (बुधवार) सकाळी ६.३० वाजता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JUN 2017
पुढारी

# जागतिक योगदिनी विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योगदिन दि. २१ जून रोजी साजरा होत आहे. यानिमित्त जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्थांच्या वतीने विविध कार्यक्रमांसह योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. कोल्हापूर शहरासह जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्था, जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या शाळा, महाविद्यालयांमध्ये योगाभ्यास घेतला जाणार आहे. यात जिल्हा परिषदेच्या सुमारे २६७९ प्राथमिक शाळांमधील सुमारे ३ लाख १३ हजार ५२५ विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठात श्री क्षेत्र सिद्धगिरी कणेरी मठ यांच्या वतीने श्री काडसिद्धेश्वर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सकाळी ६ ते ९ या वेळेत विद्यापीठातील लोककला केंद्रात तिसरा आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा करण्यात येणार आहे.

2 1 JUN 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृतीमध्ये केआयटी प्रथम

## सलग दहा वर्षे पारितोषिक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगला शिवाजी विद्यापीठ, गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१७ मध्ये ग्रामीण गटात अभियांत्रिकी विभागात प्रथम क्रमांक मिळाला.

इचलकरंजी येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, परीक्षा व मूल्यांकन संचालक डॉ. महेश काकडे व कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते केआयटीच्या वतीने अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह भेट देऊन सन्मानित करण्यात आले. दहापेक्षा जास्त वर्षांपासून केआयटी सलगपणे हे पारितोषिक पटकावत आहे.

यावेळी कुलगुरू म्हणाले, महाविद्यालयामध्ये गुणवत्ता आहे, हे सिद्ध करण्यासाठी संशोधन प्रकल्पावर भर द्यावा लागेल, विविध उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती द्यावी लागेल व प्राचार्यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना संशोधनांसाठी प्रेरित करावे.



**केआयटीच्या वतीने माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह स्वीकारताना अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अन्य.**

या पारितोषिकाने केआयटीमध्ये दिले जाणारे शिक्षण व गुणवत्ता आधोरेखित झाली आहे. केआयटीने नॅक 'ए' हे मानांकन दोनवेळा, एनबीए नामांकन, विद्यापीठाची कायमस्वरूप संलग्नता व आता स्वायत्त (ऑटोनॉमस) असा दर्जा मिळविला. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमधून केआयटीचे कौतुक होत आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजिद हुदली व विश्वस्त आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JUN 2017

तरुण भारत



कोल्हापूर : विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये केआयटी प्रथम आल्याबद्दल कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना डॉ. महेश चव्हाण. सोबत महेश काकडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे,आदी.

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये केआयटी प्रथम

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये कोल्हापूर इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग विभागाने 'अभियांत्रिकी विभागात' प्रथम क्रमांक पटकावला. डीकेटीईमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात (शैक्षणिक वर्ष २०१६–१७) मानपत्र देवून केआयटीचा गौरव करण्यात आला. डीकेटीई संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे यांच्या हस्ते केआयटीचे अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांनी मानपत्र स्वीकारले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, महाविद्यालयामध्ये गुणवत्ता आहे हे सिध्द करण्यासाठी संशोधन प्रकल्पावर भर द्यावा लागेल. विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांची माहिती देवून, विद्यार्थ्यांसह प्राचार्य व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रेरित करावे. केआयटीची गुणवत्ता अधोरेखित झाली आहे, म्हणूनच केआयटीला प्रथम पारितोषिक मिळाले. केआयटीला विद्यापीठाची कायमस्वरूपी संलग्नता व युजीसीची 'स्वायत्तता' मिळाल्याबद्दल केआयटी संस्थेचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजिद हुदली, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांचे अभिनंदन केले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे, प्रा. एस. जी. कानिटकर, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, आदी उपस्थित होते.

2 1 JUN 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये 'केआयटी' प्रथम

## अभियांत्रिकी विभागात बाजी : दहा वर्षांपासून सलग पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : येथील कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने (केआयटी) शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१७ मध्ये ग्रामीण गटातील अभियांत्रिकी विभागात प्रथम क्रमांक पटकाविला. गेल्या दहा वर्षांपासून 'केआयटी'ने हे पारितोषिक सलगपणे मिळविले आहे.

इचलकरंजी येथील कार्यक्रमात माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते 'केआयटी'चे अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र व स्मृतिभेट देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, महाविद्यालयामध्ये गुणवत्ता आहे. ती सिद्ध करण्यासाठी संशोधन प्रकल्पावर भर द्यावा लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांची माहिती द्यावी लागेल.



शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीतील ग्रामीण गटातील अभियांत्रिकी विभागामधील प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र व स्मृतिभेट 'केआयटी'चे अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी प्रदान केली. यावेळी शेजारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे, आदी उपस्थित होते.

### प्रत्येक घटकाचे अभिनंदन

पारितोषिकाने 'केआयटी'मध्ये दिले जाणारे शिक्षण व गुणवत्ता अधोरेखित झाली आहे. 'केआयटी'ने नॅक 'अ' मानांकन, दोन वेळा एनबीए मानांकन, विद्यापीठाची कायमस्वरुपी संलग्नता व आता स्वायत्तता असा दर्जा मिळविला आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन मेनन, भरत पाटील, साजिद हुदली, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी संस्थेच्या प्रत्येक घटकाचे अभिनंदन केले.

प्राचार्यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रेरित करावे. उद्योगातील बदल्या गरजांची माहिती घेत महाविद्यालयांनी त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे काळाची गरज असल्याचे मत शिंदे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JUN 2017

सकाळ

# गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये 'विवेकानंद' प्रथम

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव कार्यक्रमात विवेकानंद महाविद्यालय याहीवर्षी प्रथम आले. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी शहरी गटातून सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्त्या मिळविल्या. याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचा सत्कार झाला. इचलकरंजीतील डीकेटीई कॉलेजमध्ये झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कल्लाप्पाणा आवाडे होते. प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, "विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून प्राध्यापकांच्या सहकार्याने आम्ही यशस्वी विद्यार्थी घडविण्याचा ध्यास घेतला आहे. यासाठी पालकांचेही पाठबळ मिळाले. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांचे मार्गदर्शन लाभले."

2 1 JUN 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेज गुणवत्ता शिष्यवृत्तीत 'विवेकानंद' प्रथम

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये विवेकानंद महाविद्यालयाने कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक पटकावला. विवेकानंद कॉलेज शहरी गटातून गेली १७ वर्षे प्रथम आहे. इचलकरंजीतील डीकीटीईमध्ये झालेल्या शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे यांच्या हस्ते विवेकानंदला पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी पारितोषिक स्वीकारले.

प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयानुसार वाटचाल करणारे विद्यार्थी, प्राध्यापक यांचे हे श्रेय आहे. महाविद्यालयातील प्रत्येक घटकाला विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांचे सातत्याने मार्गदर्शन असते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून प्राध्यापकांच्या सहकार्याने यशस्वी विद्यार्थी घडवण्याचा ध्यास आहे. त्यासाठी पालकांच्या पाठबळाची गरज आहे, अशी आशा डॉ. होनगेकर यांनी व्यक्त केली.

21 JUN 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिष्यवृत्तीतून गुणवत्ता वाढीचा प्रयत्न'

## विद्यापीठाच्यावतीने शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'ज्ञानसंस्कार वृद्धीसाठी शिष्यवृत्ती हे प्रोत्साहनाचे महत्त्वाचे माध्यम आहे. या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश आहे. तसेच येत्या काळात महाविद्यालयातील संशोधनात्मक कार्य पाहून 'रिसर्च परफॉर्मिंग कॉलेज' म्हणून महाविद्यालयांचा गौरव करण्याचा मानस आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज केले.

इचलकरंजी येथील डीकेटीई महाविद्यालयात झालेल्या शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठ आणि डीकेटीईचे टेक्स्टाइल अॅण्ड इंजिनीअरिंग इन्स्टिट्युट यांच्या संयुक्त विद्यमाने डीकेटीईच्या ऐतिहासिक दरबार हॉलमध्ये शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ, गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सत्कार समारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'गेली १९ वर्षे शिवाजी विद्यापीठाने विद्यापीठातील जे विद्यार्थी अभ्यासक्रमात पहिल्या, दुसऱ्या व अंतिम वर्षाच्या परीक्षांत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येतात. त्यांच्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत शहरी, निमशहरी व ग्रामीण गटातून सर्वाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता शिष्यवृत्ती संपादन केलेली आहे. अशा महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यामागे गुणवत्ता वाढवण्याचा मुख्य हेतू आहे.'

कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, शिक्षण शास्त्र व विधी विद्याशाखांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेचे डेप्युटी डायरेक्टर अॅडमिनिस्ट्रेशन प्रा. डॉ. यू. जे. पाटील, प्रा. डॉ. सौ. एल. एस. आडमुठे, शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, घाळी कॉलेजचे प्राचार्य एम. आर. पाटील, डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे आदी उपस्थित होते.

कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी डीकेटीईची स्थापना व वस्त्रोद्योगाच्या प्रगतीचा इतिहास सांगितला. संचालक प्रा. डॉ. पी.व्ही. कडोले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. एस. जी. कानिटकर यांनी सूत्रसंचालन केले.

21 JUN 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील ऑनलाईन बुक स्टोअरचे उद्घाटन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना कार्यभार स्वीकारून २ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. देवानंद शिंदे यांच्या कुलगुरू पदाच्या कारकीर्दीस दोन वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विद्यापीठाच्या स्वतंत्र ऑनलाइन बुक स्टोअरचे उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील प्रकाशने विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'एसयुके ई- स्टोअर'चे तसेच 'एम्प्लॉईज कॉर्नर''च्या विस्तारित सेवेचा उद्घाटन सोहळा राजर्षी शाहू सभागृहात झाला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या प्रकाशन विभागातर्फे आजपर्यंत अनेक दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. काही पुस्तकांना देशातूनच नव्हे, तर परदेशातूनही मागणी आहे. मात्र ही पुस्तके केवळ प्रकाशन विभागातच उपलब्ध होती. हा माहितीचा, ज्ञानाचा खजिना वाचकांसाठी खुला करण्याचे स्वप्न मी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन बुक स्टोअरवरुन पहिले पुस्तक खरेदी करून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना प्रदान करताना प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले. सोबत डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे.

बाळगले होते. त्यानुसार, आज विद्यापीठाच्या स्वतंत्र ई-बुक स्टोअरचे दालन वाचकांसाठी खुले केले आहे. सध्या अधिक मागणी असणारी पुस्तके या व्यासपीठावर उपलब्ध केली असली, तरी टप्प्याटप्प्याने अन्य पुस्तकेही या व्यासपीठावरून खरेदीसाठी उपलब्ध केली जातील.

विद्यापीठाच्या एम्प्लॉईज कॉर्नर या सुविधेद्वारे सेवकांना त्यांचे पगारपत्रक उपलब्ध करून देण्यात येत असे. त्यामुळे बराचसा कागद वाचविला गेला. आजपासून या व्यासपीठावर गुंतवणुकीचे विवरण आणि प्राप्तीकराचा अर्ज क्र. १६ ही ऑनलाईन उपलब्ध करून दिला आहे. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह विद्यापीठाच्या वैधानिक अधिकाऱ्यांना या तिन्हीचे वितरण वित्त व लेखा विभागाच्या वतीने करण्यात आले. यावेळी मिडियाटेक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश शिंदे यांनी एसयुके ई-स्टोअरविषयी सादरीकरण केले. आजपासून या स्टोअरची लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येणार आहे. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. पी.एन. भोसले यांच्यासह विद्यापीठाचे सर्व अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या पहिल्या महिला अधिष्ठाता



आयुष्यात आपल्याला अनेक व्यक्ती भेटतात. काहींची मैत्री नमस्ते, नमस्कार याच्या पलीकडे जात नाही; पण काही व्यक्ती आपल्या मनावर एवढी छाप पाडतात की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आपल्यावर पडतो. त्यांच्यातील लकबी, विचार करण्याची पद्धत, बोलण्याची शैली एवढेच नव्हे तर त्यांचे वर्तन, निर्णय घेण्याची क्षमता याचाही कळत-नकळत आपल्यावर परिणाम होतो. शिवाजी विद्यापीठात मी रुजू झाल्यावर अवती-भवतीच्या प्राध्यापकांपैकी ज्यांच्याशी अकृत्रिम स्नेह तयार झाला, त्यापैकी एक म्हणजे प्रा. डॉ. वासंती रासम. विद्यापीठाच्या दीर्घ सेवेनंतर त्या या महिन्यात निवृत्त होत आहेत.

प्रथमदर्शनी डॉ. वासंती रासम दक्षिणेच्या वाटतात; पण मूळ मराठी असलेल्या डॉ. रासम यांचे बालपण व शिक्षण कर्नाटकातील हुबळी शहरात झाले. वडील रेल्वे खात्यात नोकरीला असल्याने त्यांना देशातील अनेक पर्यटनस्थळे पाहण्याच संधी मिळाली. शिक्षणामध्ये हुशार असलेल्या डॉ. रासम यांनी धारवाडच्या विद्यापीठात राज्यशास्त्र विषयात सर्वप्रथम येऊन हरदेकर मंजप्पा सुवर्णपदक प्राप्त केले. त्यावेळी त्यांचे मोठे बंधू डॉ. के. के.कावळेकर हे शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक व नंतर अनेक वर्षे विभागप्रमुख होते. मूळचे कोकणातील आणि कोल्हापुरात बीएसएनएलमध्ये अभियंता असलेले प्रतापचंद्र रासम यांच्याशी डॉ. वासंती रासम यांचा विवाह झाल्यामुळे त्या कोल्हापुरात आल्या. मूळ स्वभावाप्रमाणे त्या स्वस्थ बसणे शक्य नसल्याने त्यांनी विद्यापीठात राज्यशास्त्र विषयात पीएचडी संशोधनाचे काम सुरू केले. शाळांमध्ये अध्यापनाचे काम करत नंतर त्या विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापक म्हणून १९८६ साली रुजू झाल्या. १९८६ ते २०१७ या ३१ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी अध्यापनाबरोबरच विद्यापीठाच्या सर्व अधिकार मंडळांवर कार्य केले. यामध्ये अॅकॅडमिक कौन्सिल, सिनेट व व्यवस्थापन परिषद, खरेदी समिती, कँटीन समिती, अँटी रॅगिंग समिती, तक्रार निवारण समिती, अभ्यास मंडळाचे सदस्य यांचा प्रामुख्याने समावेश आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्राच्या पहिल्या महिला अधिष्ठाता होण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला. एवढेच नव्हे तर शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक संघटना, 'सुप्टा'च्या त्या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या.

अधिकार मंडळामध्ये कार्यरत असताना त्यांनी अनेक प्राध्यापक, विद्यार्थ्यांचे प्रश्न अग्रक्रमाने सोडविले. अधिष्ठाता झाल्यानंतर त्यांच्या भेटीसाठी येणाऱ्या व्यक्तींची कायम वर्दळ त्यांच्या कार्यालयात असे. विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात त्यांनी गौरवपत्रांचे खणखणीत आवाजात केलेले वाचन अनेकांच्या आजही लक्षात आहे. त्या कर्नाटकातील असल्याने मराठी भाषेच्या विविध अर्थांच्या छटा समजून घेऊन त्याचा अवलंब करण्याचा त्या जाणीवपूर्वक प्रयत्न आजही करतात. इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व असल्याचे त्यांना तुम्ही आवश्यक तेथे इंग्रजीतून बोला, असा अनेकांचा आग्रह असतो. डॉ. रासम यांनी २२ विद्यार्थ्यांना एम. फील. व २० विद्यार्थ्यांना पीएचडीचे मार्गदर्शन केले व करत आहेत. अनेक विद्यापीठांशी त्या संलग्न असल्याने अभ्यासक्रमांबरोबर आधारित क्रमित ग्रंथलेखन त्यांनी केले. इतर अकरा पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. यूजीसीसह अनेक प्रकल्प पूर्ण केले. चीन, श्रीलंका या देशांच्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेतला. सामाजिकशास्त्रांच्या प्राध्यापकांना संशोधनासाठी अनेक मर्यादा येतात असे डॉ. रासन यांना वाटत असल्याने विद्यार्थी व प्राध्यापकांना त्या शक्य तितके सहकार्य करतात. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्या २०१० ते २०१३ या कालावधीत विभागप्रमुख, यूजीसी स्पर्धा केंद्राच्या समन्वयक, सामाजिकशास्त्र विषयाच्या रिसर्च जर्नलच्या संपादक, नेहरू सेंटर व शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक म्हणून त्यांनी भरीव कार्य केले आहे. मुलींच्या वसतिगृहांच्या चीफ रेक्टर म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. डॉ. रासम यांचा आवाज ऐकला किंवा त्यांची कार पाहिली तरी वसतिगृहांमध्ये शांतता निर्माण होत असे. 'जेथे कमी तेथे मी' या भावनेने निवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाही शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजेच राष्ट्रीय युवा महोत्सव, आव्हान यांसारख्या कार्यक्रमांमध्ये पाहुण्यांची व्यवस्था करणाऱ्यांना, त्यांचे स्वागत करताना त्यांनी उत्साहाने केलेले काम पाहताना त्यांच्यातील हा उत्साह व ऊर्जा अशीच टिकावी असे मनोमन वाटते.

डॉ. रासम यांचा प्रशासकीय नेतृत्वगुण, खणखणीत आवाज, उत्तम व्यक्तिमत्त्व, दाक्षिणात्य सौंदर्य, इंग्रजी व कन्नड भाषांवरील प्रभुत्व आणि डॉ. के. के. कावळेकर यांसारख्या ज्येष्ठ बंधूंच्या मार्गदर्शनामुळे डॉ. रासम यांना अनेक संधी मिळाली असे वाटणे स्वाभाविक आहे; पण त्यामागे दडलेली त्यांची जिद्द, परिस्थितीवर मात करण्याचे त्यांचे कौशल्य, अथक परिश्रम, चिकाटी, नवीन शिकण्याची ऊर्मी आणि त्याही पलीकडे जाऊन त्यांचे कलासक्त व संवेदनशील मन हे ज्यांना माहीत नाही त्यांना डॉ. रासम समजल्या नाहीत, असेच म्हणावे लागेल. डॉ. वासंती रासम यांना प्रशासनामध्ये कुलसचिव किंवा इतर प्रशासकीय पदावर कार्य करण्याची संधी मिळाली असती तर त्यांच्या कार्याला योग्य न्याय मिळाला असता, असे वाटते.

● डॉ.